महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११/२५२५२०
Email ID : rdc.palghar-mh@gov.in

---

**वाचले :**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.२९/०७/२०२०.
५) या कार्यालयाचा मनाई आदेश क्र.गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.३९/२० दि.३१/०७/२०२०.
६) तहसीलदार डहाणू तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डहाणू यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण/कोविड-१९/कावि-३०३/२० दि.३०/०७/२०२०.

---

क्र.गृह/का.१/टे.३/डहाणू-मनाईआदेश/एस.आर.४०/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक ०१/०८/२०२०

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे आवश्यक आहे. त्याकरिता उपोद्‌घातातील अ.क्र.५ अन्वये पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्‌घातातील अ.क्र.६ अन्वये तहसीलदार डहाणू तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डहाणू यांनी डहाणू नगरपरिषद हद्दीमध्ये कोविड-१९ चे बाधित रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता कोविड-१९ चा संसर्ग मोठया प्रमाणावर होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून डहाणू नगरपरिषद हद्दीमध्ये अत्यावश्यक सेवा व बँकांनी टोकन पध्दतीने कामकाज सुरु ठेऊन उर्वरित सर्व हालचाली बंद करणेबाबत दि.०४/०८/२०२० ते दि.१३/०८/२०२० पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मनाई आदेश लागू करणेकामी आदेश होणेस विनंती केली आहे.

त्याअर्थी मी, **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयातील **डहाणू नगरपरिषद हद्दीमध्ये सर्व प्रकारच्या हालचाली करणेकरिता मनाई आदेश दिनांक ०४/०८/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक १३/०८/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंतचे दरम्यान लागू करीत आहे.**

**तथापि, सदरहू क्षेत्रात अत्यावश्यक सेवा व बँकांनी टोकन पध्दतीचा अवलंब करुन सुरु राहण्यास यातून वगळण्यात आले आहे.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरहू आदेश आज दिनांक ०१/०८/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
३) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
४) उपविभागीय दंडाधिकारी डहाणू यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी डहाणू यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) गट विकास अधिकारी पं.स. डहाणू यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) मुख्याधिकारी नगर परिषद डहाणू यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती व प्रसिध्दीकरीता.

**जिल्हादंडाधिकारी पालघर**